# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ३९८/२०२३ दिनांक – १०/११/२०२३

## 3 लाख रुपये किंमतीचे कोकेन हा अंमली पदार्थ कब्जात बाळगणा-या परदेशी नागरीकास ताब्यात घेण्यात गुन्हे शाखा कक्ष -3 यांना यश

मिरा भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालय परिसरात अंमली पदार्थ विक्री व तस्करी करणा-या इसमाविरुध्द कडक कारवाई करुन पायबंद करणे बाबत मा. वरिष्ठांकडुन सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरार चे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गोपनीय बातमीदार याचे मार्फतीने बातमी मिळवुन दिनांक ०९/११/२०२३ रोजी १३.३० वाजता नालासोपारा पश्चिम, हनुमान नगर, स्मशानभुमी कडे जाणा-या रोडवर आरोपीत नामे - यावा अमिद रेमंड,(YAO AMED RAYMOND) वय ३९ वर्षे, रा. प्रगती नगर, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर मुळ राहणार – कोलाबा, देश नायजेरीया याचे कब्जातुन ३० ग्रॅम वजनाची सफेद रंगाची पावडर ही कोकेन नावाचा अंमली पदार्थ असा एकुण ३, ००, ०००/- रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

सदर आरोपीत विरुध्द नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५२६/२०२३ एन.डी.पी.एस. कलम ८(क), २१(ब) प्रमाणे. गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास नालासोपारा पोलीस ठाणे करीता आहे.

वरील कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो., (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त सो., (गुन्हे) मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ अभिजित टेलर, उमेश भागवत, पोहवा/ अशोक पाटील, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं./ सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब/ गणेश यादव, सागर सोनवणे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.

********